पुढारी पा. नं. ९.

# वनविभागाच्या कारवाईविरोधात वसई प्रांत कार्यालयावर धडक मोर्चा

## शेतकऱ्यांची तोडलेली २० घरे वन विभागाचे अधिकारी पुन्हा बांधून देणार

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयावर वनविभागाच्या कारवाईविरोधात व शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी वसई प्रांत कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर किसान सभेच्या शिष्टमंडळाने चर्चा केली असता ती घरे पुन्हा बांधून देऊ असे अधिकाऱ्यांनी मान्य केले.



सदर मोर्चा अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉम्रेड डॉ. अशोक ढवळे यांच्या नेतृत्वाखाली व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे डहाणू विधानसभा आमदार विनोद निकोले यांच्या मार्गदर्शनानुसार काढण्यात आला. यावेळी

वन विभागातील अधिकाऱ्यांनी १५० शेतकऱ्यांच्या घरांवर नोटीस काढून कारवाई केली होती. त्यांच्या निषेधात उक्त मोर्चा काढण्यात आला होता. तसेच रेशन, वनपट्टा, बेकायदा खदानीचे खोदकाम असे बरेच प्रश्न या मोर्चाच्या माध्यमातून उपस्थित केले होते. त्याअनुषंगाने अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने वसई प्रांत कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

दरम्यान, १५० घरांपैकी २० घरे वन खात्याचे अधिकाऱ्यांनी तोडून टाकली होती. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांबरोबर किसान सभेच्या शिष्टमंडळाने चर्चा केली असता ती घरे पुन्हा बांधून देऊ असे अधिकाऱ्यांनी मान्य केले. तसेच यापुढे अशी कोणतीही कारवाई करणार नाही, असे आश्वस्त केले. यावेळी मागण्या पूर्ण झाल्यामुळे शेतकऱ्यांनी जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची, इनक्लाब जिंदाबाद अशा क्रांतिकारक घोषणा दिल्या.

# वॉशिंग सेंटरमध्ये कामगाराचा शॉक लागून मृत्यू

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईदरमध्ये हरि ओम मारुती वॉशिंग सेंटरमध्ये काम करणाऱ्या कामगाराचा शॉक लागून मृत्यू झाला. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निलेश प्रजापती (२४ ) हा भाईदर पूर्वेला असलेल्या हरि ओम मारुती वॉशिंग संटर येथे गाडी धुण्याचे काम करतो. निलेश प्रजापती हा त्याच्या कामावर तो कार वॉशिंगचे काम करत असताना शॉक लागून तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी टेंभा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे त्याच्या नातेवाईकांना वॉशिंग सेंटरच्या मालकाने फोन करून सांगितले. त्यानंतर ते निलेश याला रुग्णालयात बघण्यासाठी आले असता त्यांना तेथील डॉक्टरांनी निलेश मयत झाला असल्याचे सांगितले. तेव्हा निलेश काम करीत असलेल्या वॉशिंग सेंटरचे मालक विशाल सिंग याने निलेश

वॉशिंग सेंटरमध्ये कार वॉशिंगचे काम करत असताना त्यांचे हातातील नोझल मध्ये करंट येऊन नोझल गळ्यास चिटकून निलेश याला शॉक लागून त्यास दुखापत झाली व त्यात त्याचा मृत्यू झाला, असे त्याने सांगितले. त्यामुळे विशाल सिंग याने त्याच्या देखरेखीखाली काम करत असताना कामगाराच्या सुरक्षेची कोणतीही उपाययोजना न करता बेजबाबदारपणे व निष्काळजीपणे विद्युत उपकरणाच्या बाबतीत हयगयीचे वर्तन करून निष्काळजीपणामुळे निलेश प्रजापती याला शॉक लागून त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाल्यामुळे विशाल जयप्रकाश सिंग याच्याविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ८.

# अहमदाबाद महामार्गावर नवी मुंबई, ठाणेकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना प्रवेश बंदी

## महाराष्ट्रभूषण पुरस्कार सोहळ्यानिमित्त वाहतूककोंडी रोखण्यासाठी उपाययोजना

**तलासरी : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी मुंबई -अहमदाबाद महामार्गावर गुजरात कडून येणाऱ्या ठाणे, नवी मुंबई कडे जाणाऱ्या अवजड वाहनां रविवारी रात्री बारा वाजेपर्यंत प्रवेश बंद करण्यात आले आहे. त्यासाठी गुजरात महाराष्ट्र सीमेवर अच्छाड येथे पोलीस बंदोबस्त लावून आवज वाहने थांबविता आले आहे. आच्छाड, दापचरी आणि महामार्गावरील धावे, हॉटेल, पेट्रोल पंपावर अवजड पार्क करण्यात आल्याचे पोलिस निरीक्षक अजय वसावे जिल्हा वाहतूक पोलीस असिफ बेग यांनी माहिती दिली आहे.




श्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्रभूषण पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रम पार पाडणार असून, सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, इतर विविध विभागांचे मंत्री महोदय व इतर महत्वाच्या व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतून ५० ते ७० लाख लोकांचा जनसमुदाय उपस्थित राहणार असल्याने मुंबई - अहमदाबाद महामार्ग क्रमांक ४८ वरील वाहतूक शनिवारी २ वाजेपासून ते रविवारी सदर कार्यक्रम संपल्यानंतर रात्री १२ वाजेपर्यंत अहमदाबाद महामार्गावरील अवजड वाहतूक बंद केली आहे.

पुढारी पा. नं. ९.

# दाम्पत्याची ७१ लाखांची फसवणूक

## मिरा रोडमध्ये शेअर मार्केटमध्ये नफ्याचे आमिष

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा देण्याचे आमिष दाखवून मिरारोड येथील कनाकीया परिसरात राहणारे जगदीश शाहरी यांना व त्यांच्या पत्नीची ७१ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरारोड येथील कनाकीया परिसरात राहणारे जगदीश शाहरी यांच्या पत्नी दिव्या शाहरी या विलेपार्ले येथे कामाला असून त्या रेल्वेने प्रवास करतात. प्रवासादरम्यान त्यांची ओळख डिम्पल गुप्ता हिचेशी झाली होती. ते नियमीत एकत्र प्रवास करत असल्याने त्यांची चांगली मैत्री झाली होती. प्रवास दरम्यान डिम्पल गुप्ता हिने दिव्या हिला सांगितले की, तिची मैत्रिण शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करते व त्याचे तिला चांगले नफा मिळतो. त्यावेळी दिव्या हिने त्याकडे दुर्लक्ष केले. २०१३ मध्ये डिम्पल ही दिव्या यांच्या घरी आली त्यावेळी तिने दिव्या यांच्या सासूला १ लाख रुपये गुंतवणूक केल्यास ८ हजार रुपये प्रत्येक महिन्याला मिळतील असे सांगितले. त्यावेळी त्यांनी १ लाख रुपये गुंतवणूक करण्यास सांगून डिम्पलच्या बँक खात्यामध्ये पैसे दिले. त्यानंतर दर महिन्याला ८ हजार रुपये परत दिले. ती वेळेत पैसे पाठवत असल्याने तिने जगदीश त्यांची पत्नी व आईचा विश्वास संपादन करुन घेतला होता. त्यानंतर २०१५ मध्ये डिम्पलने पाच लाख रुपये गुंतवणूक केल्यास सहा महिन्यानंतर ८ लाख रुपये मिळतील असे सांगितले.

दरम्यान, ५ लाखाची गुंतवणूक केली. सहा महिन्याने डिम्पल हिने ८ लाख रुपये परत केले. त्यावेळी डिम्पलला गुंतवणूक करणाऱ्या तिच्या मैत्रिणीबाबत विचारले असता तिने तिच्या मैत्रिणीचे नाव शर्मिला अडसुळे असल्याचे सांगितले होते. त्यानंतर पुन्हा गुंतवणूक केली त्यावेळी देखील परतावा परत केला.

जगदीश व त्याच्या आईला डिम्पल गुप्ता व शर्मिला अडसुळे यांचेकडुन गुंतविलेल्या रक्कमेचा वेळेवर परतावा मिळत असल्याने त्यांचा त्या दोघीवर विश्वास बसला होता. त्यामुळे जगदीश व त्यांच्या पत्नी व आईने मोठी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी वेळोवेळी बँक ट्रान्सफर व रोख रक्कम स्वरूपात डिम्पल गुप्ता व शर्मिला अडसुळे यांचे बँक खात्यावर ७१ लाख रुपये जमा केली.

Scanned with CamScanner

सामना पा.नं.- II

# वाहतूक पोलिसाला नेले फरपटत

## नवी मुंबईतील घटनेचा थरारक व्हिडीओ व्हायरल



नवी मुंबई : वाहतूक पोलिसाला एका कारचालकाने कारच्या बोनेटवरून फरपटत नेल्याचा प्रकार शनिवारी उघडकीस आला.

नवी मुंबई, ता. १५ (वार्ताहर) : अमली पदार्थ व स्फोटके असल्याच्या संशयावरून कारला थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या वाहतूक पोलिसाला एका कारचालकाने आपल्या कारच्या बोनेटवरून वाशीतून पाम बीच मार्गावरून थेट उरण रोडवर १० ते १२ किलोमीटर फरपटत नेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

नवी मुंबईतील या घटनेतील वाहतूक पोलिस सिद्धेश्वर माळी हे वाशी वाहतूक शाखेत कार्यरत असून शनिवारी दुपारी ते वाशीतील ब्ल्यू डायमंड चौकात वाहतूक नियमनासाठी कार्यरत होते. या वेळी कोपरखैरणे येथून वाशीच्या दिशेने येणारी एक चारचाकी त्यांनी थांबण्याचा इशारा केला; मात्र, आरोपी कारचालक आदित्य धोंडीराम बेमडे (वय २२) त्या ठिकाणी न थांबता त्याने पलायन केले. त्यामुळे माळी यांनी दुचाकीने या कारचा पाठलाग करून त्याला एपीएमसीतील अन्नपूर्णा चौकात थांबवले. या वेळी आदित्य बेमडे याने त्यांच्या अंगावर गाडी घालून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वाहतूक पोलिस माळी यांनी स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न करत कारचे बोनेट पकडले. या वेळी आरोपीने माळी यांना आपल्या कारच्या बोनेटवर लटकलेल्या अवस्थेत ठेवून आपली कार भरधाव वेगात पाम बीच मार्गावरून थेट उरणच्या दिशेने १० ते १२ किमी नेली. अन्नपूर्णा चौकात कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांनी याबाबतची माहिती नियंत्रण कक्षाला देऊन या कारचा पाठलाग सुरू केला. या वेळी गव्हाणफाटा येथील वाहतूक पोलिसांनी साई मंदिर येथे भररस्त्यात दोन ट्रेलर आडवे लावून नाकाबंदी करून ही कार अडवून वाहतूक पोलिस माळी यांची सुटका केली. त्यानंतर कारचालक आदित्य बेमडे याला कारसह ताब्यात घेऊन त्याला वाशी पोलिसांच्या स्वाधीन केले. दरम्यान, नवी मुंबईतील विविध चौकांत लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत या घटनाक्रमाचे थरारक व्हिडीओ कैद झाले असून हे व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल होत आहेत.

### आरोपी नशेत असल्याचे उघड

घटनेतील आरोपी आदित्य बेमडे हा नशेत असल्याचे त्याच्या वैद्यकीय तपासणीत आढळून आले आहे. नशेत कार चालवताना पकडले जाण्याच्या भीतीने त्याने कार न थांबवता पळवून नेल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे.

# श्रद्धा हत्याकांड : आफताबवरील आरोप निश्चितीचा निर्णय राखीव

← पुण्यनगरी पा.नं. 2.

**नवी दिल्ली :** लिव्ह इन पार्टनर श्रद्धा वालकरच्या हत्येचा आरोपी आफताब पूनावाला याच्याविरोधात आरोप निश्चित करण्यासंदर्भातील आपला निर्णय दिल्लीतील सत्र न्यायालयाने शनिवारी राखून ठेवला. या प्रकरणी पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजी होणार आहे.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनीषा खुराना कक्कड यांच्या न्यायालयात शनिवारी आरोपांवरील युक्तिवाद पूर्ण झाला. यादरम्यान श्रद्धाच्या वडिलांनी अंतिम संस्कारासाठी आपल्या मृत मुलीच्या अस्थी देण्याची विनंती न्यायालयात केली. या विनंतीवर दिल्ली पोलीस पुढील सुनावणीवेळी आपली भूमिका मांडणार असल्याचे सरकारी वकील अमित प्रसाद यांनी सांगितले. दिल्लीतील महरौली परिसरातील एका फ्लॅटमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या आफताबने आपली लिव्ह इन पार्टनर श्रद्धाची हत्या केली. हत्येनंतर तिच्या मृतदेहाचे सुमारे ३५ तुकडे करून ते तीन आठवडे फ्रीजमध्ये ठेवले. यानंतर एकेक करून या तुकड्यांची विल्हेवाट लावली. आफताबने पोलीस चौकशीत आपला गुन्हा कबूल केला आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु. ५-१.

# घनकचरा वाहतुकीसाठी कालबाह्य गाड्या

## ठेकेदारावर गुन्हा दाखल करून ठेका रद्द करण्याची मागणी

**मीरा रोड** : मीरा-भाईंदर शहरातील घनकचरा वाहतुकीसाठी महापालिकेने नवीन ठेकेदाराची नियुक्ती केली आहे. या ठेकेदाराकडून दैनंदिन घनकचरा वाहतुकीसाठी कालबाह्य गाड्यांचा वापर केला जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कालबाह्य गाड्यांचा वापर करत असल्यामुळे यापूर्वीदेखील अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या वाहनांवर अनेक वेळा कारवाईदेखील करण्यात आलेली आहे. नव्या ठेकेदाराकडूनसुद्धा



पुन्हा कचरा वाहतुकीसाठी अनेक कालबाह्य गाड्यांचा वापर केला जात असल्याचे दिसत आहे. याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे ठेकेदारावर गुन्हा दाखल करून ठेका रद्द करण्याची मागणी सामाजिक संस्थेकडून करण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर महापालिका हद्दीत दररोज जवळपास ५०० टन घनकचऱ्याची निर्मिती होत आहे. हा कचरा गोळा करून, तो वाहनांच्या मदतीने उत्तन येथील कचरा प्रकल्पात प्रक्रिया करण्यासाठी टाकला जातो. त्यासाठी महापालिकेने दोन विभागांमध्ये कंत्राटदाराची नियुक्ती केली


### पालिका आयुक्तांना साकडे

कंपनीचा ठेका रद्द करून ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा तसेच प्रादेशिक परिवहन विभागाने या गाड्या जप्त करण्याची मागणी शिवसमर्थ प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष गणेश बामणे यांनी मीरा-भाईंदर मनपा आयुक्त दिलीप ढोले, मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे, वाहतूक विभाग व प्रादेशिक परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

### दरमहा कोट्यवधींचा खर्च

शहरातील दैनंदिन घनकचरा वाहून नेण्यासाठी महापालिका घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नव्याने कोणार्क इन्फ्रा. कंपनीला ठेका देण्यात आला आहे. हा कचरा उचलण्यासाठी ठेकेदाराकडून वाहने वापरली जात आहे. या कंपनीकडून १८ कालबाह्य आणि योग्यता प्रमाणपत्र नसलेल्या गाड्यांचा वापर करण्यात येत आहे. योग्यता प्रमाणपत्र पडताळणी करून कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा ठेका रदद करावा, अशी मागणी केली आहे.

# जलवाहिनी फुटल्याने मीरा-भाईंदरमध्ये पाणीटंचाई



**मीरा रोड** : मीरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा करण्यात येतो. शहराला एमआयडीसी प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीचा एअर व्हॉल्व्ह बदलापूर रोड, समाधान हॉटेलसमोर शनिवारी सकाळी अचानक तुटल्याने मीरा-भाईंदर शहरास होणारा पाणीपुरवठा खंडित करण्यात आला होता. या जलवाहिनीवरील एअर व्हॉल्व्ह दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर केले असून, जवळपास हे काम करण्यासाठी १० तास लागले आहेत. दुपारी चारच्या सुमारास काम पूर्ण झाले असून, पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. हे दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत मीरा-भाईंदर शहरात होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला होता.

तसेच स्टेमकडून होणारा पाणीपुरवठा सुरुच होता. एमआयडीसी प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. पुढील काही तास मीरा-भाईंदर शहरास पाणीपुरवठा कमी दाबाने व उशिराने होईल. नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे मीरा-भाईंदर महापालिका पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता शरद नानेगांवकर यांनी सांगितले आहे.

Scanned with CamScanner

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक. ०२१ | रविवार १६ एप्रिल २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८

# गुन्हे शोध कक्षाची कारवाई; लाखोंच्या मालासह दोन अट्टल गुन्हेगारांना अटक

**वसई.** चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन चोरट्यांना जेरबंद करण्यात वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध कक्षाच्या पथकाला यश आले आहे. या दोघांच्या अटकेने १० गुन्ह्यांचे (चोरी) गूढ उकलले आहे. आणि तीन लाखांहून अधिक किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. डीसीपी (परिमंडळ २) पौर्णिमा चौगुले श्रृंगी आणि एसीपी चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सीनियर पीआय कैलाश बर्वे आणि वालीव पोलीस स्टेशनचे सीनियर पीआय कैलास बर्वे यांच्या नेतृत्वाखाली एपीआय ज्ञानेश फडतरे आणि राहुलकुमार पाटील (गुन्हे पीआय) यांच्या पथकाने हे यश मिळवल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस, वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवसेंदिवस चोरी व घरफोडीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, या संदर्भात वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व गुन्हे रोखण्याबाबत सूचना व मार्गदर्शन केले होते. त्यानुसार वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यांचा शोध गुप्ता आधारावर माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि गुन्ह्याच्या ठिकाणाहून मिळालेल्या माहितीवरून सेलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आरोपी (१) भावेश महेश वेदक (२२) आणि बदरियालम अकलाकाख चौधरी उर्फ पप्पू (३०) यांना ७ एप्रिल रोजी ताब्यात घेतले. पोलिसांनी सांगितले की त्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत त्याने १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्याला अटक करण्यात आली असून, दागिने व इतर साहित्य एकूण ३,४२,००० रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.



Scanned with CamScanner

# रिक्शा चोरी के आरोपी गिरफ्तार

■ **निसं, नालासोपाराः** तुलिंज पुलिस ने रिक्शा चोरी में लिप्त एक गैंग के दो आरोपियों को गिरफ्तार किया है। उनके पास से चार रिक्शा व एक बाइक बरामद हुई है। गैंग के सदस्य डुप्लिकेट नंबर प्लेट लगाकर इन वाहनों का उपयोग करते थे। तुलिंज पुलिस स्टेशन की डिटेक्शन टीम ने एक सूचना के आधार पर विरार के कुंभार पाडा इलाके से प्रकाश पोतराज त्रिवेदी और शिवकुमार हरिहर गुप्ता को गिरफ्तार किया।

Scanned with CamScanner

# दो चोर अरेस्ट, लाखों का माल जब्त

■ निसं, वसई: वालीव पुलिस ने दो चोरों को गिरफ्तार किया है। आरोपियों ने वालीव क्षेत्र में दस से अधिक घरों में सेंधमारी की है। इनके पास से साढ़े तीन लाख रुपये से अधिक का माल बरामद हुआ है। पुलिस ने सीसीटीवी फुटेज की मदद से वसई से भावेश महेश वेदक और बद्री आलम अकलाख चौधरी उर्फ पप्पू को गिरफ्तार किया है।

Scanned with CamScanner

## अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई

## १६० ग्रॅम वजनाचा ३२ लाख किमतीचा

# अंमली पदार्थ जप्त





पोलिसांनी एका नायजेरियन नागरिकाला अटक करून त्याच्याकडून तब्बल १६० ग्रॅम वजनाचा ३२ लाख रुपये किमतीचा मॅफेड्रॉन नावाचा अंमली पदार्थ जप्त केला आहे. पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याचे नाव इबे इबे उर्फ चिमा मोजेस (वय ३७) असे आहे. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून १६० ग्रॅम वजनाचा ३२ लाख रुपये किमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

विजय माने

विरार, दि १५ : नालासोपारा (पूर्व) परिसरात अंमली पदार्थ खरेदी विक्री करणाऱ्या परकीय नायजेरियन नागरिकाविरुद्ध माहिती प्राप्त करून अंमली पदार्थ विरोधी कक्षाने कारवाई केली आहे.

यामध्ये पोलिसांनी एका नायजेरियन नागरिकाला अटक करून त्याच्याकडून तब्बल १६० ग्रॅम वजनाचा ३२ लाख रुपये किमतीचा मॅफेड्रॉन नावाचा अंमली पदार्थ जप्त केला आहे. बुधवारी (दि १२) अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक अमर मराठे व त्यांच्या पथकाने नालासोपारा (पूर्व) परिसरात पेट्रोलिंग करीत असताना प्रगती नगर, हायटेन्शन रोडवर श्रीगुरु अपार्टमेंट जवळ एक परकीय नायजेरियन इसम संशयास्पदरित्या उभा असल्याचे दिसले. त्याला हटकले असता त्याने दोन पोलिसांना धक्काबुक्की करून पळून जाण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याचे नाव इबे इबे उर्फ चिमा मोजेस (वय ३७) असे आहे. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून १६० ग्रॅम वजनाचा ३२ लाख रुपये किमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

आरोपीविरुद्ध तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३१२/२०२३ एनडीपीएस कायदा १९८५ चे कलम ८(क), २२(क) सह भा.द.वि.सं. कलम ३५३, ३२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास तुळींज पोलिस करीत आहेत.

अटक आरोपी इबे इबे उर्फ चिमा मोजेस याच्याविरोधात यापूर्वी विरार व तुळींज पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विक्री आणि ताब्यात बाळगल्याबाबत गुन्हा दाखल असून मुंबई शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सायबर पोलीस ठाण्यात माहिती व तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत देखील गुन्हा दाखल आहे.

पोलीस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक अमर मराठे, सहा.पोलीस निरीक्षक अमोल आंबवणे, सहा. पोलीस निरीक्षक विलास कुटे, पोहवा. इंगळे, टक्के, पाटील, आव्हाड, गरगुडे, सावकाळ, म.पोहवा. एकलदेवी आणि पोअं. यादव यांनी कामगिरी पार पाडली आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# महिला वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** कर्तव्यावर असलेल्या महिला वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की केल्याप्रकरणी नालासोपारा येथे चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिविक सेंटर, हनुमान मंदिराजवळ महालक्ष्मी मोबाइल शॉपसमोर शनिवारी सकाळी दहाच्या सुमारास महिला वाहतूक पोलिस सुनीता काशिनाथ जाधव यांनी वाहतुकीस अडथळा आणणारी वाहने काढून टोइंग करीत असताना रामविलास विश्नोई, कैलास विश्नोई, शेराराम विश्नोई व गणपतलाल विश्नोई यांनी त्यांना दमदाटी करत हुज्जत घातली होती. वाहतूक शाखेचे पोलिस भरत मुढे हे मदतीला गेले असताना चारही आरोपींनी त्यांना सरकारी कामात अडथळा आणत धक्काबुक्की करत महिला पोलिसाला शिवीगाळ व दमदाटी केली. दरम्यान, कर्तव्यावर असताना एका महिला वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की झाल्याने संताप व्यक्त होत आहे.

Mumbai Main
Page No. 9 Apr 17, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

## वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षाची कामगिरी

# घरफोडी व चोरी करणारे दोन सराईत गजाआड



विशेष प्रतिनिधी

वसई, दि. १५ : वालीव पोलीस ठाणे हद्दीत सतत दिवसा व रात्री चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली होती. याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेऊन गुन्हे उघडकीस आणणे आणि त्याला पायबंद घालण्यासाठी सूचना केल्या होत्या. वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांनी गुप्त बातमीदार, तांत्रिक विश्लेषण व घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी भावेश महेश वेदक (वय २२) रा. चिंचपाडा, वालीव आणि बदीआलम अखलाख चौधरी उर्फ पप्पू या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी वालीव पोलीस ठाणे हद्दीत १० गुन्हे केल्याचे कबूल केले. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

त्यांच्याकडून सोन्याचे दागिने व इतर वस्तू असा एकूण ३ लाख ४२ हजार रुपये किंमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांनी केलेले १० गुन्हे हे वालीव हद्दीतील असून याच वर्षातील आहेत. वरील कामगिरी पोलीस उपआयुक्त परि-२ वसई श्रीम. पौर्णिमा चौगुले- श्रींगी, तुळींज विभागाचे सहा. पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोहवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, संतोष गायुडे, बाळू कुटे, पोअं. गजानन गरीबे, अभिजीत गढरी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner